# राजगड खोऱ्यात भीषण पाणीटंचाई

▶ वार्ताहर

खडकवासला, दि. १३ : वेल्हे तालुक्यातील राजगड खोऱ्यात भीषण पाणीटंचाईमुळे सात हजारांवर रहिवाशांना तीव्र उन्हात वणवण भटकावे लागत आहे. पिंपरी, वाजेघर खुर्द, वाजेघर बुद्रुक, पाल बुद्रुकची हरिजनवस्ती, मेटपिलावरे, वऱ्हाटवाडी आदी ठिकाणी भीषण पाणीटंचाईने उग्र रूप धारण केले आहे.

पाल बुद्रुक येथील हरिजनवस्तीतील रहिवाशांना दीड किलोमीटर अंतराची पायपीट करून खाटपेवाडी येथील हातपंपावरून पाणी आणावे लागत आहे.

वस्तीतील विहिर दीड महिन्यांपूर्वी कोरडी पडली आहे तर नळयोजना दहा वर्षांपासून धूळ खात पडली आहे. नळयोजना दुरुस्त करून पाण्याचा प्रश्न सोडवावा, अशी मागणी मावळा संघटनेचे स्थानिक कार्यकर्ते किरण विष्णू खाटपे व प्रकाश नथू पवार यांनी केली आहे.

पिंपरी, वाजेघर खुर्द येथे पाणीटंचाईची तीव्रता अधिक आहे. ओढे-नाले, विहिरी कोरड्या पडल्याने प्रचंड अतिवृष्टीच्या राजगड खोऱ्यातील रहिवाशांना मिळेल तेथून पाणी आणून तहान भागवावी लागत आहे. प्रशासनाने कोणत्याही, वाड्या-वस्ती, गावात टँकरने पाणी पुरवठा सुरू केला नाही.

This PDF file is Created by trial version of 123 PDF Creator.
Please use purchased version to remove this message.